राज्यातील वरिष्ठ दर्जाच्या पोलीस पदांची श्रेणीवाढ / श्रेणीअवनत करणे

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : आयपीएस-१२०६ / प्र.क्र.२६० / पोल - १
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२, दिनांक १४ जून, २००७

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या ,शहरातील लोकसंख्येत झपाटयाने होत असलेली वाढ,राज्यात झालेली औद्योगिक वाढ, इत्यादीमुळे निर्माण झालेली वाहतुकीची समस्या , आधुनिकीकरणामुळे गुन्हयांच्या प्रमाणात झालेली वाढ व त्याचे बदलले स्वरुप ,नक्षलग्रस्त भागातील वाढत्या कारवाया ,रेल्वेवर झालेले अतिरेक्यांचे हल्ले,मुक्त अर्थव्यवस्थेमुळे आर्थिक गुन्हयामध्ये झालेली वाढ ,इत्यादीमुळे गुन्हे अन्वेषण ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,इत्यादी सारख्या तपास यंत्रणेवर होणारा ताण कमी करुन पोलीस दल सक्षम करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी यांच्या संख्येत वाढ करण्यात आली आहे.सदर बाबी विचारात घेता ,पोलीस विभागातील कामामध्ये सुसुत्रता आणण्याच्या दृष्टीने ,राज्यातील वरीष्ठ दर्जाच्या पोलीस पदांची श्रेणीवाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. तसेच राज्य मानवी हक्क आयोगाच्या नियमातील तरतुदीनुसार , आयोगाच्या कामात सुसुत्रता आणण्याच्या दृष्टीने ,आयोगाच्या आस्थापनेवर असलेले अपर पोलीस महासंचालक दर्जाचे पद श्रेणीअवनत करणे, त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या विविध आस्थापना / महामंडळे यांच्या आस्थापनेवरील प्रतिनियुक्तीवर असणा-या पदांच्या कामाचा आढावा घेऊन व त्यांची आवश्यकता लक्षात घेऊन काही पदे श्रेणीअवनत करण्याचा प्रस्ताव शासन विचाराधीन होता.

शासन निर्णय :

३. उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने खाली दर्शविलेल्या पदांची श्रेणीवाढ करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे :

(१) विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या पदांची अपर पोलीस महासंचालक दर्जाच्या पदामध्ये श्रेणीवाढ.

| अ.क्र. | विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाचे सध्याचे पद (वेतनश्रेणी : १८,४००-५००-२२,४००/-) | अपर पोलीस महासंचालक दर्जामध्ये श्रेणीवाढ केल्यानंतरचे पद (वेतनश्रेणी : २२,४००-५२५-२४,५००/-) |
|---|---|---|
| १ | विशेष पोलीस महानिरीक्षक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई | अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| २ | विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई | अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ३ | विशेष पोलीस महानिरीक्षक (लोहमार्ग), महाराष्ट्र राज्य, मुंबई | अपर पोलीस महासंचालक (लोहमार्ग), महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ४ | विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य,मुंबई | अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ५ | विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई | अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य,मुंबई |
| ६ | विशेष पोलीस महानिरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई | अपर पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ७ | विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षलविरोधी अभियान, नागपूर | अपर पोलीस महासंचालक, नक्षलविरोधी अभियान, नागपूर |

(२) पोलीस उपमहानिरीक्षक दर्जाच्या पदांची विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या पदामध्ये श्रेणीवाढ

| अ.क्र. | पोलीस उपमहानिरीक्षक दर्जाचे सध्याचे पद (वेतनश्रेणी : १६,४००-४५०-२०,०००/-) | विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जामध्ये श्रेणीवाढ केल्यानंतरचे पद (वेतनश्रेणी :१८,४००-५००-२२,४००/-) |
|---|---|---|
| १ | पोलीस उपमहानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई | विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| २ | पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई | पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई |

| अ.क्र. | पोलीस उपमहानिरीक्षक दर्जाचे सध्याचे पद (वेतनश्रेणी : १६,४००-४५०-२०,०००/- ) | विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जामध्ये श्रेणीवाढ केल्यानंतरचे पद (वेतनश्रेणी :१८,४००-५००-२२,४००/-) |
|---|---|---|
| ३ | पोलीस उपमहानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे | विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे |
| ४ | पोलीस उपमहानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर | विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर |
| ५ | पोलीस आयुक्त, नाशिक शहर | पोलीस आयुक्त, नाशिक शहर |
| ६ | पोलीस उपमहानिरीक्षक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| ७ | पोलीस उपमहानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे. | विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे. |
| ८ | पोलीस उपमहानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, पुणे | विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, पुणे |

(३) पोलीस अधीक्षक / पोलीस उपआयुक्त दर्जाच्या पदांची पोलीस उपमहानिरीक्षक दर्जाच्या पदामध्ये श्रेणीवाढ.

| अ.क्र. | पोलीस अधीक्षक / पोलीस उपायुक्त दर्जाचे सध्याचे पद (वेतनश्रेणी : १०,०००-३२५-१५,२००/- ) | पोलीस उपमहानिरीक्षक दर्जामध्ये श्रेणीवाढ केल्यानंतरचे पद (वेतनश्रेणी : १६,४००-४५०-२०,०००/-) |
|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे | पोलीस उपमहानिरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य,पुणे |
| २ | पोलीस अधीक्षक, नक्षलविरोधी अभियान, नागपूर | पोलीस उपमहानिरीक्षक, नक्षलविरोधी अभियान, नागपूर |
| ३ | सह आयुक्त (दक्षता), अन्न व औषध प्रशासन, मुंबई | सह आयुक्त (दक्षता), अन्न व औषध प्रशासन, मुंबई |

४. तसेच खाली नमूद केलेल्या पदांची श्रेणीअवनती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे :

(१) अपर पोलीस महासंचालक दर्जाच्या पदाची विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या पदामध्ये श्रेणी अवनती करणे.

| अ.क्र. | अपर पोलीस महासंचालक दर्जाचे सध्याचे पद (वेतनश्रेणी : २२,४००-५२५-२४,५००/- ) | विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जामध्ये श्रेणीअवनत केल्यानंतरचे पद (वेतनश्रेणी : १८,४००-५००-२२,४००/-) |
|---|---|---|
| १ | अपर पोलीस महासंचालक, राज्य मानवी हक्क आयोग, महाराष्ट्र राज्य,मुंबई | विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य मानवी हक्क आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई |

(२) विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या पदांची पोलीस उपमहानिरीक्षक दर्जाच्या पदांमध्ये श्रेणी अवनती करणे.

| अ.क्र. | विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाचे सध्याचे पद (वेतनश्रेणी :१८,४००-५००-२२,४००/-) | पोलीस उपमहानिरीक्षक दर्जामध्ये श्रेणीअवनत केल्यानंतरचे पद (वेतनश्रेणी : १६,४००-४५०-२०,०००/-) |
|---|---|---|
| १ | संचालक, दक्षता व सुरक्षा, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई | संचालक, दक्षता व सुरक्षा, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई |
| २ | मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई. | मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई. |
| ३ | मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई. | मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई. |

५. वर नमूद केलेल्या पदांची श्रेणीवाढ / श्रेणीअवनती ही त्या पदांवर त्या त्या दर्जाचे अधिकारी नेमण्यात आल्यावर व त्यांनी त्या पदांचा प्रत्यक्ष कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

६. वरील पदांच्या श्रेणीवाढीमुळे होणारा खर्च हा त्या पदांचे सध्याचे वेतन ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येत आहे त्याच लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा व तो खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक : सीआर-१६८/व्यय-७ दिनांक ०८.०६.२००७ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००७०६१३१५३१०७००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.ज.महाजन)

सहसचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग

- मा.राज्यपाल यांचे सचिव
- मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
- मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव

- ...थमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव
- ...सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
- अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
- प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा) यांचे स्वीय सहाय्यक
- प्रधान सचिव (विशेष),गृह विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
- प्रधान सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई
- प्रधान सचिव (उर्जा),उद्योग,उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई
- प्रधान सचिव (परिवहन),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई
- प्रधान सचिव,गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई
- महासंचालक व पोलीस महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य,मुंबई
- महासंचालक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई
- सचिव,महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.,मुंबई
- उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,मुंबई
- सचिव,महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,मुंबई
- महालेखापाल - १ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा ),महाराष्ट्र राज्य,मुंबई
- महालेखापाल - २ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा ),महाराष्ट्र राज्य, नागपूर
- अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
- निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
- गृह विभागातील सर्व कार्यासने
- वित्त विभाग व्यय-७ ,मंत्रालय,मुंबई
- लेखा अधिकारी,भापोसे कक्ष, गृह विभाग
- निवड नस्ती